# पु.ल.

# विशेषांक...

## व्यक्ती आणि वल्ली..!!

==========================================




संपादक -
सुप्रिया (जोशी) जाधव. पुणे
रेणुका (रेपाळ) खटावकर. पुणे
सुधीर सुरेश मुळीक. मुंबई

# "विनोदाशी जडले नाते" ...

"ह्या जगात येताना जसा गुपचुप आलो, तसा जाताना देखील आपल्या हातून या जगाला फारसा धक्का न लावता निघून जाण्याची इच्छा बाळगणारा असा मी एक असामी आहे." हे उद्‌गार आहेत,आपल्या निखळ विनोदाने अवघ्या महाराष्ट्राला हसवत राहणाऱ्या एका असामान्य 'वल्ली'चे अर्थात्‌ आपल्या सर्वांच्या लाडक्या पु. ल. देशपांडे यांचे !

पुलंच्या विनोदाबद्दल किती आणि काय बोलायचे ? पुलंचे विनोद, आंब्याच्या डहाळीवर बसून गाणाऱ्या कोकीळेच्या कुहू-कुहू सारखे मधुर आहेत; पिंजऱ्यातील पोपटाच्या पंखांच्या फडफडाटासारखे केविलवाणे नाहीत. पुलंचा विनोद कधीही कोंडल्यासारखा वाटत नाही; उलट कोंदटलेल्या जीवांना मोकळ्या हवेत श्वास घेऊ देणारा तो भासतो. कुणाचेही मन दुखावले जाईल असा विनोद पुलंनी कधीच केला नाही. कुत्सितपणा टाळून केलेल्या सत्यनिवेदनाला परखडपणाची झालर चढते, फटकळपणाचे ठिगळ नाही. पुलंचा विनोद आरशासारखा स्वच्छ आहे; असा आरसा की ज्यात अक्राळविक्राळ विद्रूप सत्याला, विनोदाचा, सहनशीलतेचा मुलामा चढवून समोर उभे केले जाते, तेही सुसह्य स्वरुपात ! म्हणूनच, भाजीत झुरळ सापडल्याच्या तक्रारीला, स्वतःची मिशी अजिबात न फेंदारता, "बंडोपंत, मंथली ट्वेंटी टू रुपीजमध्ये एलिफंट का यायचा भाजीत ?" हे जगप्रसिद्ध उत्तर देणारा खाणावळवाला पुलंच्या विनोदातच दर्शन देतो.

पुलंचा विनोद सहजगत्या घडून येतो, तो मुद्दाम घडवून आणावा लागत नाही. " एक तारखेला दूधवाले, घरवाले, कोळसेवाले, दारेवाले, धोबी, आणि डॉक्टर, हे 'षड्रिपू' थैमान घालतात," यासारख्या विनोदात मध्यमवर्गीयांची फार मोठी व्यथा दडली आहे; पण विनोदाच्या चादरीखाली या व्यथा झाकून जातात व म्हणूनच त्या सुसह्य वाटू लागतात.

साध्या-साध्या गोष्टींत देखील विनोद शोधण्यासाठी पुलंचीच नजर हवी. "कापड दुकानातले नोकर लोक हे गेल्या जन्मीचे योगी असतात, अशी माझी ठाम श्रद्धा आहे. बनारसी शालू आणि राजापुरी पंचा एकाच निर्विकार मनानं दाखवतात. लुगड्यांच्या शेकडो घड्या मोडतात, पण चेहऱ्यावरची घडी मोडू देत नाहीत." किंवा "तुकारामाचं पूर्ण नांव काय ? ह्या प्रश्नाला तुकाराम विष्णुपंत पागनीस ---



हे उत्तर दिल्यामुळं,मंबाजीनं तुकोबाला बदडलं नसेल इतकं आमच्या बाबांनी आम्हांला बदडलं होतं. बाबांच्या शेंडीच्या केसाचा देखील दाह झाला नाही." या ठिकाणी, तुमच्या-आमच्या आसपास घडणाऱ्या घटना वेगळ्या पद्धतीने पाहण्याची नजर पुलंचा विनोदच देतो. स्वतः शिक्षकी पेशात असूनही एके ठिकाणी ते म्हणतात, "प्रोफेसर हा माणूस आणि लिफ्टमन हे हसू शकतात हे मला कधीच पटले नाही." असे विनोदाचे बादशहा पु.ल. जेव्हा त्यांच्या अनुभवी नजरेसमोरुन सरकणाऱ्या काळाचे उलटे फासे पाहतात, तेव्हा मात्र सभोवती, कारुण्याची किनार असणाऱ्या कृष्णमेघांची दाटी होऊ लागते -"स्वराज्य आले हत्तीवरुन मिरवीत. अंबारीत राजेंद्रबाबूंच्या हाती कलश होता, समोर घोड्यावर बसून चालले होते जवाहरलाल - फक्त बापू मात्र आमच्याबरोबर पायी चालत होते."

काही ठिकाणी पु.ल. सहजगत्या सत्यपरिस्थिती सांगून जातात, "आम्ही ओझ्याचे बैल हेच खरं ! शिंगाला झेंडू बांधा नाहीतर पोत, पाठीवर झूल चढवा किंवा चाबूक उडवा, जोडले एकदा की थांब म्हणेपर्यंत चालले !" तसेच जाताजाता ते नेत्यांच्या आश्वासनांची व कार्यपद्धतीची खिल्लीही उडवतात - "शाळांच्या इमारतींची संख्या वाढली म्हणून शिक्षण घेणे आणि देणे याविषयीची आस्था वाढली असे मानावयाचे म्हटले तर, ज्या गावात विपुल देवळे व मशिदी आहेत, तिथली माणसे धर्मावतार आहेत असे मानावे लागेल."पुलंचे विनोदी वाङ्मय 'विपुल' असले तरी पु.ल. म्हणजे विनोद एवढेच नव्हे. एक अष्टपैलु व्यक्तिमत्व कसं असावं याचा आदर्श नमुना म्हणजे पु.ल. विनोदी लिखाणाबरोबरच प्रवास वर्णने, चरीत्रे, भाषांतरे,चित्रपट कथा लेखन, कविता, गीत-संगीत अशा साहित्याच्या व कलेच्या प्रत्येक क्षेत्रात पुलंनी मुशाफिरी केली आहे.


जाज्वल्य देशाभिमान हाही पुलंचा एक पैलु आहे. एक आठवण पुल सांगतात "मिठाच्या सत्याग्रहाचे दिवस होते. लॅमिंग्टन रोडवर पोलिस स्टेशनपाशी सत्याग्रहींचा जथ्था आला होता. लोक निर्भयपणे पोलिसांच्या गाडीतून घुसून स्वतःला अटक करुन घेत होते. त्या गर्दीत एक तरुण स्त्री होती. तिने आपल्या अंगावरचे दागिने उतरले, शेजारच्या एका माणसाच्या हाती दिले. त्याला आपले नाव सांगितले, पत्ता सांगितला आणि म्हणाली, "माझ्या घरी हे दागिने नेऊन द्या आणि सांगा 'म्हणावे, मी सत्याग्रहात गेले'." तो गृहस्थ म्हणाला, "बाई, तुमची माझी ओळखदेख नाही. तुमचे हे दागिने मी तुमच्या घरी पोहोचवीन असा तुम्हाला विश्वास का वाटतो?" "तुमच्या अंगावर खादी आहे आणि डोक्यावर गांधी टोपी आहे म्हणून." "खरोखर पुलंबद्दल काय लिहावं आणि किती लिहावं !



शेवटी पु.लं.चेच उद्‌गार '

"घड्याळाचं काय नि माणसाचं काय, आतलं तोल सांभाळणारं चाक नीट राहिलं की फार पुढंही जाण्याची भिती नाही आणि फार मागंही पडण्याची नाही !"

मंदार शिंदे ...



हौसेसाठी प्रवास करणा-या टूरीस्टला मराठीत काय म्हणावं,
असा प्रश्न पुलंना कुणी तरी विचारला.
त्यावर पटकन पुल म्हणाले,
" त्यात काय ? सफरचंद म्हणावं. "

मराठी प्रतिशब्दांच्या बाबतीत असंच एकदा बोलणं चाललं
असताना पुलंनी विचारलं,
एअरहोस्टेसला आपण हवाई सुंदरी म्हणतो,
तर नर्सला दवाई सुंदरी का म्हणू नये ?

आणि वाढणा-याला आपण जर वाढपी म्हणतो,
तर वैमानिकाला उडपी का म्हणू नये ?


त्याच सुरात पुलं खूप दारू पिणा-याला पिताश्री म्हणतात ...

हे... हे... हे...

असेच एक पिताश्री ...



# आमचे हे जेव्हा जेव्हा घेतात ......



घ्यायचीय आज· या जाणीवेने ,
सकाळपासूनचं ·तरंगत· असतात....
मच्छी करी कि खरपूस फ़्राईड ,
चिकन सुख्खा कि रस्सा चमचमीत....
चिकन बिर्याणी नि मटण सोलापूरी ,
कि चविष्ठ खिमा थोडा थपथपित ?
सकाळपासून दिवेलागणी पर्यंत ,
चर्चासत्रांच्या फ़ैरीवर फ़ैरी झडतात...
आमचे ·हे· जेव्हा जेव्हा ·घेतात· ......!!!

अभ्यासु वृत्ती , चिकत्सक स्वभाव ,
भाळले होते ज्यावर त्याचाचं प्रत्यय देतात !
वेगळाले ब्रँडस ....घेण्याच्या पध्दती ,
चकण्याच्या सोबतीने चवीचवीने चघळतात...
मित्रांच्या सवयी , ठेवणीतले विनोद ,
एरव्हीचे घुमे त्यावेळी भडभडून बोलतात...
भिजत पडलेल्या माझ्या कित्येक मागण्या ,
आणिबाणी तत्वावर त्वरीत मंजूर होतात ....
आमचे ·हे· जेव्हा जेव्हा ·घेतात· ......!!!

असा हा मनासारखा जमल्यावर बेत ,
अहो, काय सांगू? शिळ सुध्दा घालतात...
माझं सौंदर्य ....माझे आदर्श गुण ,
मलाचं नव्याने पुन्हा कळतात !
मुलाची हुशारी...त्याची सादगी...
उज्वल भविष्याचे आराखडे बनतात !
फ़ोनवरचं बोलणं, नातेवाईकांची आस्थेवाईक चौकशी,
सगळ्या सगळ्या जगावर बेहद्द खुष असतात...
आमचे ·हे· जेव्हा जेव्हा ·घेतात· ......!!!



- सुप्रिया जाधव.



# पुलंचे काही किस्से ...

एकदा वसतंराव देशपांडे पु.लं. ना म्हणाले
"हि मुलगी (सुनिताबाई) म्हणजे एक रत्न आहे'.
ह्यावर पु.लं. लगेच म्हणाले
'म्हणुनच गळ्यात बांधुन घेतलय!!

आपल्या पत्नीच्या सतत उपदेश करण्याच्या तथाकथित
सवयीमुळे पु.ल. एकदा आपल्या पत्नीला-सुनीताताईंना
म्हणाले," या घरात मी तेवढा देशपांडे आहे. तू 'उपदेश-पांडे' आहेस."

एकदा एक भोजन समारंभात पु.लं. च्या एक बाजुला
ना.ग. गोरे आणि दुस-या बाजुला
भुजंगराव कुलकर्णी बसले होते. पु.लं. म्हणाले,
"आफतच आहे. एकिकडे नाग आहे तर दुसरीकडे भुजंग! !!"

एकदा पु.लं. ना एक कुकरी सेट गिफ्ट म्हणुन मीळाला.
तो सेट सुनिता देशपांडे आपल्या भाचीला दाखवत होत्या.
सुनिताबाईंचा 'सर्व काही जपुन ठेवण्याचा स्वभाव माहित
असल्यामुळे भाची सुनिताबाईंना म्हणाली -

" अगं, एवढा सुदंर सेट फुटु नये या भितीने तु तो
कधी वापरणारच नाहीस का?"


त्यावर पु.लं. पटकन म्हणाले "हो तर !!
सुनीता मला कधी ओमलेट सुद्धा करुन देत नाही ...
अंडी फुटतील म्हणुन !!! "

हे... हे... हे...

अशाच एका किचनमध्ये लूडबूड करणा-या
नवरोबाची कविता ---



# स्वयंपाकघरात थोडी लुडबूड ...




खर बोलतात सगळेच नवरोबा
हल्लीच्या मुलींना स्वयंपाकही येत नाही....
कविता वगैरे ठिक आहे, पण सांगा त्यांना
कवितेनं पोट मात्र भरत नाही.

स्वयंपाकच काय.... सगळ्याच गोष्टीत
बायकोला मदत आम्ही करु.
स्वयंपाक तिने केला तर भाजी आणायची
जवाबदारी हाती आमच्या धरु.
पण स्वयंपाकही आम्हीच केला तर
ती काय फ़क्त कविता करेल?
गरिब बिचा-या नव-यासोबत
त्या शब्दांनाही तव्यावर धरेल....

यमक जुळवता जुळवता
भाजी खुडायची राहते
दूध ऊतू जाऊन गॅसवरुन मग
किचेन ओट्यावर वाहते....
भातात किती पाणी घालू?
अजून आईला विचारता....
अरे वरणभातही शिजवता येईना,
पण मुलांना कवितेतही धारेवर का धरता?

प्रत्येक सणाला सासुरवाडिवरुन
आईला येतो फोन....
सगळ्या सणांना पुरणपोळीचा नैवेद्य का गं..
त्रासिक असतो टोन..
आर्धा किलो गुळ, दिड किलो डाळ,
दोन-चार वेलदोडे अन टाकू का जायफळं दोन?
(दोन जायफळं??) अगं जेवतानाच झोपतील जावाईबापू,
आईनं सांगताच आदळते तिकडून फोन.





ईडलीचं पिठ किती दिवस भिजवायचं?
आईनं भिजवून दिलं तर किती वेळ शिजवायचं?
पोळ्या म्हणजे तर एकेका राज्याचा नकाशा असतो....
जेवण म्हणजे भूगोलाचा तास....
अन ऑफिसात डबा ऊघडल्या ऊघडल्या हशा पिकतो.

कधीतरीच घरी ईडली किंवा जरा वेगळा बेत असतो....
आर्ध कच्चं आर्ध पक्क शिजलं की पुरता बेत फसतो....
हा फसलेला बेत अन तिचा त्रागा पाहून
नवरा बचावात्मक पवित्रा घेतो.
अन स्वयंपाकघरातला राडा तसाचं ठेवून
मग तिला घेऊन हॉटेलात जेवायला जातो.

जेवता जेवाता विचारतो मग,
ए.... एवढ्यात कविता केली नाहीस का कुठली नवी....?
विसर जरा ते स्वंयपाकघर अन घरकाम (ते तर रोजचंच आहे)...
एक खरं सांगू, तुझ्यासारखी रसिक बायको मिळायला
खरंच नशिबाची साथ हवी ....

कुणाल ...

अरुण आठल्ये आणि पुलं एकदा चायनीज रेस्टॉरंटमध्ये
जेवण्यासाठी म्हणून गेले. चायनीज फूडचं वैशिष्ट्य सांगताना
पुलं म्हणाले,
' चायनीज फूड स्टार्टस वुईथ चिलीज & एण्डस वुईथ लिचीज.
चायनीज फूड पाहताच त्यांना आजची शिक्षणपद्धती आठवते.
जेवण घेताना खूप जेवल्यासारखं वाटतं, पण थोड्याच वेळात
भूक लागते, हे लक्षात घेऊन पुलं म्हणतात,
आपल्या शिक्षणासारखं हे चिनी जेवण घेताना खूप घेतल्यासारखं
वाटतं, पण प्रत्यक्षात पोट रिकामंच राहतं.

चिनी स्वीट कॉर्न सूप फार प्रसिद्ध आहे. या जेवणात मका फार वापराला जातो.
त्यावर पुलंचं भाष्य : चिनी भोजनाला सर्वात्मका म्हणायला हवं !!!





## कसे उरतील सये...

कसे उरतील सये माझ्याविन पैसे तुझे
उरताना आणि सांग, घ्यायचं काहीतरी राहिलंय ना
गुलाबाची फुलं आणि संध्याकाळी ठेल्यावर
मुसूमुसू करताना खायची पाणिपुरी राहिलीय ना....
राहिलीय ना

दिवसभर बाईकवर झेलताना गारवारा
होई तुझे मन बावरे...
ओठ वर हसे हसे..गर्दीपाहून वेडेपिसे
आज तुझे मन का बरे...?
आता जरा धकाधकी, प्रवास नाही सुखासुखी
धरताना लोकल तुही रडशील ना...रडशील ना...

आता तुझ्या अंगणात कोणी नाही सामसूम
झोप आता बंदकर दिवा...
आणि रात ढळेलच, आणि पुन्हा छळेलच
पहाटेचा वेडा गारवा...
गारठ्यात कॉफीसंग..सपनात जूने रंग...
पुन्हा पुन्हा सांग तु भरशील ना..भरशील ना...

आता नाही बोलायाचे, असे कसे वागायाचे
नाकारूनी हा पारवा...
कापायाला नवीन कुणी, माझ्याहून साळसूद
बकरा आता तुला हवा...
नजरेचे वार तुझे, हसून गोड बघशील
लाडे लाडे वागशील..
एका तरी वेडा तुझा करशील ना....करशील ना...

आनंद माने.



हे झाल प्रेयसीच पण बायको बरोबर असताना उडणारी तरंबळ काही निराळीच असते
अशावेळी पुलंचे मार्गदर्शन बघा उपयोगी पडतय का ...
पुल म्हणतात ...

बायकोबरोबर खरेदीला निघालेल्या नव-याचा आणि वधस्तंभाकडे नेलेल्या वसंतसेनाघातकी चारुदत्तचा अभिनय सारखाच असतो. तीच हतबलता, तीच चिंता काही फरक नाही. बायकांना ज्या काही गोष्टी फक्त स्वतः:लाच उत्तम जमतात असं वाटतं त्यातली खरेदी ही महत्वाची बाब आहे. दोन पैशाचा अळू असो, नाहीतर दोनशे रुपयांचा शालू असो, दक्षता तीच, जिकर तीच, हुज्जत तीच किंबहुना दुकानदाराशी हुज्जत घालायची पराकाष्ठेची तयारी हा तर खरेदीशास्त्राचा पाया आहे. तुम्हाला जर बायकोबरोबर खरेदीला जायचं असेल देव करो आणि असले प्रसंग फारसे तुमच्यावर न येवोत. तर एक गोष्ट प्रथम लक्षात घेतली पाहिजे. "लवकर आटपा" हे वाक्य चुकूनसुद्धा उच्चारता कामा नये. राग, लोभ, क्रोध वगैरे जिंकायची योगसाधना संसारात राहून देखील करायची असेल तर बायकोबरोबर खरेदीला जावं.

थोडक्यात म्हणजे बायकोबरोबर खरेदीला जातांना आपण लोकांच्या मुलांच्या वाढदिवसामुळं अगदी मनापासून आनंद झालेल इसम मला अजून भेटायचा आहे. तरीही आपण जातो कर्तव्य म्हणून. तीच गत पत्नीबरोबरच्या खरेदीची. इथं आनंद होण्यापेक्षा झाला आहे हे भासवण्याला अधिक किंमत आहे. मात्र एका गोष्टीला अजिबात भिऊ नये. पुष्कळदा आपल्याला वाटतं, कुटुंबाच्या चिकित्सक स्वभावामुळं दुकानदार चिडेल, भांडणतंटा होईल, पण दुकानदार चिडत नाही. कारण तोही बिचारा नवरा असतो. त्याची बायको देखील खरेदीला गेली त्याची हीच अवस्था करते. आणि नव-याच्या दुकानातुन ती कधीही साड्या नेत नाही. तुम्ही कधी कापडवाल्याची बायको त्याच्या दुकानात खरेदीला आलेली पाहिली आहे? मी नाही पाहिली.आणि खरोखरच अमुक तमुक मंडळींची मंडळी आपल्या यजमानांच्या दुकानात आलीच खरेदीला, तर "तुमच्यापेक्षा लोकमान्यात कितीतरी व्हरायटी आहे" असं नव-याचा तोंडावर सांगून लुगड्यांच्या ढिगा खाली त्याला गाडून निघून जाईल. स्त्रिस्वभाव म्हणतात तो हाच, तो समजावून घेण्यात निम्मं आयुष्य निघून जातं.



हे झाल अपघात झालेल्यांसाठी आणि अपघाताच्या तयारित असणा-यांसाठी पुलंचे पुढचे पत्र ...

डॉ. श्रीरंग आडारकर यांचे चिरंजीव अशोक आडारकर यांना त्यांच्या विवाहानिमित्त
पु. ल. देशपांडे यांनी पाठविलेले पत्र...

पु. ल. देशपांडे,
१, रुपाली, ७७७, शिवाजी नगर, पुणे - ४.
८ जून १९८०

प्रिय अशोक आजचा दिवस तुझ्या आणी कोमलच्या आयुष्यात सर्वात महत्वाचा. सुमारे चौतीस वर्षांपूर्वी, जून महिन्यातच असाच एक महत्वाचा दिवस माझ्या आणी तुझ्या सुनीतामावशीच्या आयुष्यात आला होता. या चौतीस वर्षांच्या अनुभवाच्या आधारावर 'लग्न' या विषयावर तुला चार उपदेशपर गोष्टी सांगाव्या, असं मला वाटतं. वास्तविक लग्न या विषयावर कुणीही कुणालाही उपदेशपर चार शब्द सांगू नये, असा माझा सगळ्यांनाच उपदेश असतो. तरीही यशस्वी संसारासंबंधी चार युक्तीच्या गोष्टी तुला सांगाव्या, असं मला वाटलं. या संबंधात ऑस्कर वाइल्डचे एक वाक्य ध्यानात ठेव. "A Perfect marriage is based on perfect mutual misunderstanding".लग्न हे नवराबायकोच्या एकमेकाविषयी असणा-या संपूर्ण गैरसमजाच्या आधारावरच यशस्वी होत असते. आता माझेच उदाहरण देतो. मी अत्यंत अव्यवस्थित आहे, असा सुनीताचा लग्न झाल्या क्षणापासून आजतागायत गैरसमज आहे. लग्नाच्या रजिस्टरबुकात सही करायला मी खुर्चीवर बसलो, तो नेमका तिथे ठेवलेल्या रजिस्ट्रारच्या हॅटवर. ही गोष्ट खरी आहे. पण मी त्याचा त्या ह्यॅटीवर बसण्यापूर्वीची तिची अवस्था आणि मी बसल्यानंतरची अवस्था यात मला तरी काहीच फरक दिसला नाही. एकदा कुणाच्या तरी चष्म्यावर बसलो होतो, तेव्हा मात्र बसण्यापूर्वीच्या माझ्या लेंग्याच्या आणि काचा घूसू नयेत तिथे घुसल्यावर झालेल्या माझ्या अवस्थेच्या आठवणीने आजही नेमका याच ठिकाणी घाम फुटतो. पण ते जाऊ दे. सांगायची गोष्ट मी अव्यवस्थित असल्याचा सुनीताचा गैरसमज मी अजूनही टिकवून ठेवला आहे. यामुळे मी प्रवासातून परतताना माझा पायजमा, टॉवेल आणि साबणाची वडी या प्रवासात विसरून येण्याच्याच लायकीच्या वस्तू न विसरता विसरून येतो. मग सुनीताला वस्तू हरवल्याचा दु:खापेक्षा 'मी अव्यवस्थित आहे', या तिच्या मताला पुष्टी मिळाल्याचा भयंकर आनंद होतो. आता कोमल ही डॉक्टर असल्यामुळे ' तू प्रकृतीची काळजी घेत नाहीस', असा जर तिचा गैरसमज झाला, तर तो टिकवून ठेव. ---



तुला जरी तू भक्कम आहेस असं वाटत असलं, तरी स्त्री-दृष्टी हा एक खास प्रकार आहे. या नजरेने पुरुषमाणसाला पाहता येत नाही. तेव्हा तू स्वतःच्या प्रकृतीची काळजी घेत नाहीस, रात्रंदिवस हापिसच्या कामाचीच चितां करतोस असा जर कोमलचा समज झाला, तर अधूनमधून खोकला वगैरे काढून तो समज टिकवून ठेव. तिने दिलेली गोळी वगैरे खाऊन टाक. डॉक्टरीण बायकोने केलेल्या गोळीच्या सांबा-यापेक्षा ही गोळी अधिक चवदार असते, असे एका ड्रॉक्टरणीशी लग्न केलेल्या फिजिओथेरापिस्टचे मत आहे. ( पुढील सहा महिने मी जसलोकपुढून जाणार नाही! ) आता खोकला काढताना या ठिकाणी दुसरी कोणी तरुणी नाही, याची खात्री करून घे. ('तरुणी' हे वय हल्ली ५७-५८ वर्षांपर्यंत नेण्यात आले आहे. कारमायकेल रोडवरून एक चक्कर मारून आल्यावर तुला हे कळेल.) गाफीलपणाने खोकला काढलास तर 'हा खोकला कुणासाठी काढला होता ते खरं सांगा-?' या प्रश्नाचे उत्तर द्यायची हिंमत बाळगावी लागेल. तेव्हा गैरसमज वाढवत ठेवताना योग्य ती दक्षता घ्यावी.

सुखी संसारात नव-याला स्वतःचे मत नसणे, यासारखे सुख नाही. विशेषतः प्रापचिंक बाबतीत. खोमेनी, सादत, मोशे दायान, अरबी तेलाचा प्रश्न यावर मतभेद चालतील. पण भरलेले पापलेट आणि तळलेले पापलेट यातले अधिक चांगले कुठले? या विषयावर सौ.पक्षाचे मत ऐकून तेच , ग्र्याह्य मानावे. बेसावधपणाने कारवारी पद्धतीच्या स्वैपाकावर बोलून जाशील. मुख्य म्हणजे 'राव' या आडनावाचा/ची प्रत्येक व्यक्ती ही असामान्य मानावी. कुठल्या क्षणाची कुठला/ कुठली राव ही वधूपक्षाभ्या नात्यातली निघेल, हे सांगणे अशक्य आहे. मी रवींद्रनाथाविषयी नेहमी चांगलेच बोलतो याचे खरे कारण यांचे आडनाव 'ठाकूर' आहे हे तुला म्हणून सांगतो. राव या आडनावाप्रमाणे 'बोरकर' या आडनावाविषयीही सावध असावे. जरा अधिक सावध. बोलताना बारीक सारीक गोष्टींना जपावं लागतं. संसार म्हणजे खायची गोष्ट नाही. ( बायकोच्या हातचे जेवण सोडून. ते खावेच लागते.) उदाहरणरार्थ, 'मीसुद्धा मनात आणले असते, तर डॉक्टर झालो असतो,' हे वाक्य चुकूनही उच्चारू नये. उलट, 'बापरे! डॉक्टर होणं आपल्याला जमलं नसतं.याला तुझ्यासारखी निराळीच बुद्धिमत्ता लागते, ' हे वाक्य दर महिन्याला पगाराच्या दिवशी वधूपक्षाला ऐकवीत जावे. म्हणजे त्या आनंदात शॉपिंगचा बेत रद्द होण्याची शक्यता आहे. तुला एकूण Medical Profession विषयी जपूनच बोलावं लागेल. वधूपक्षातले तीन विरुद्ध तू एक या सामन्यात तुझ्या कराटेच उपयोग नाही. शिवाय कराटेमुळे विटा फोडता आल्या, तरी मते फोडता येत नाहीत. यामुळे MedicalProfession संबंधी उगीचच मतभेद व्यक्त करणे टाळावे. तुझ्या Technology बद्दल घरात एक अक्षर न काढणे बरे. फारच कोणी वधुपक्षीयांनी सख्या काय चाललंय वगैरे विचारलं, तर सात-आठ टेक्नीकल ---



शब्द घालून एक वाक्य फेक. ( यापूर्वी विचारणारा तुझ्या विषयातला नाही, याची खात्री करून घे! ) म्हणजे तू तुझ्या विषयातल्या जगातल्या पाच शास्त्रज्ञांपैकी एक आहेस, हा समज (गैरसमज म्हणत नाही! ) पक्का होईल. आणि Diamond Shamrock मधला तूच काय तो डायमंड आणि इतर सगळे Sham किंवा निर्बुद्ध rock हा समज वाढीला लागून घरात इज्जत वाढेल.

कोमलच्या गृहप्रवेशानंतर तुमच्या घरातली स्त्री-मतदारांची संख्या एका आकड्याने वाढत आहे, हे विसरू नये. भरतचा मुक्काम कुठल्या तरी अज्ञात कारणाने अमेरिकेत लांबत चालल्यामुळे तू आणि आमचे परममित्र बाबूराव ( अध्यक्ष शेणवी सहकारी पेढी ) विरुद्ध मालती, पुन्नी, कोमल असे गव्हर्मेंट आहे. तेव्हा काही दिवस तरी 'पंजा'चे राज्य आहे हे विसरू नये. आणि घरात सतत होणा-या 'शॉपिंगला' उगीचच विरोध न करता बाजारातून जे जे काही म्हणून घरात विकत आणले जाईल, याचे "अरे वा!", "छान!", ' O Wonderful!" अशा शब्दांनी स्वागत करावे. बाहेर जाताना 'ही साडी नेसू का?' हा पत्नीचा प्रश्न पतीने उत्तर द्यावे म्हणून विचारलेला नसतो. व्याकरणदृष्ट्या हा प्रश्न असला, तरी कौटुबिंक व्याकरणात ते एक 'मी ही साडी नेसणार आहे' असं Firm Statement असते. या प्रश्नाला खूप निरखून पाहिल्याचा ( साडीकडे ) अभिनय करून- वा! हूंss! - हो हो -, छान - फार तर Fantastic Idea, असे प्रसंग पाहून आवाज काढावे. अगर 'ही नेसतेस?' - अच्छा वगैरे डायलॉग म्हणावा. कृपा करून 'कुठलीही नेस. कोण बघतंय' यासारखी वाक्यं ओठाशी आली, तरी गिळून टाकावी. या बाबतीत आपल्या राष्ट्रपतींचा आदर्श मानावा. प्रधानमंत्रीजींकडून सूचना आली की लगेच Agreed म्हणून सही. राष्ट्रपतींचे हे धोरण सर्वसामान्य पतींनीही स्वीकारावे. उलट पार्टीला वगैरे जाताना 'यातला कुठला बुशशर्ट घालू? तुझा Choice नेहमीच फसक्लास असतो ' वगैरे वाक्यं टाकावी. माझ्या Choiceपेक्षा तुझा Choiceचांगला असतो, या वाक्यातली अंदरकी बात मात्र वधूपक्षाच्या लक्षात येणार नाही, याची खात्री बाळगावी. नाहीतर 'कळतात ही बोलणी ... ' हे वेदाइतकं जुनं वाक्य ऐकावं लागेल. मग यानंतरच्या प्रत्येक प्रश्नाला 'मला नाही माहीत' हे उत्तर. शेवटी प्रचंड महत्वाची गोष्ट. सौ.च्या वाढदिवसाची तारीख विसरू नये. एक वेळ ऑफिसात जाताना पॅण्ट घालायला विसरलास तरी चालेल. पण बायकोची जन्मतारीख विसरणाच्या गुन्ह्याला क्षमा नाही. इमानी नवरे हा वाढदिवस निरनिराळ्या रीतीने साजरा करतात. Presents सुद्धा देतात. पण इतर कुठल्याही Present पेक्षा या दिवशी नव-याने ऑफिसला absent राहण्यासारखे दुसरे Present नाही. कांदेनवमीला जसे आपल्याला कांदा आवडला नाही, तरी धार्मिक ----



भावनेने कांदा खातात, तसे बायकोच्या वाढदिवसाला आपल्याला एरवी, ज्यांना निर्मनुष्य बेटावर भेटले तरी टाळावे असे वाटते - तसल्या, बायकोच्या तमाम नातेवाईकांना, काहींना दुपारी आणि काहींना रात्री जेवायला बोलावण्याचा बायकोला आग्रह करावा, असे एका तज्ञ पतीचं मत आहे. म्हणजे आपण सुटी घेऊन घरी राहिलो म्हणून बायको खुश. बरं तिच्याच नातलगांना गिळायला बोलावल्यामुळे ती दिवसभर स्वैपाकघरात. घरात तिचेच नातलग आणि यांची प्रजा. घरातली काचेची भांडी या बालकांच्या सहज हाती लागतील, अशा जागी ठेवावी. भावाच्या किंवा बहिणिच्या मुलांनीच ती फोडल्यामुळे सौ.चा 'आवाज' बंद. आपणही हा मोका साधून - अहो - मुलंच ती - करणारच मस्ती. वगैरे बोलावं. आणि मेहुणे-मेव्हण्या वगैरेंच्या मुलांना सहज फोडता येतील किंवा सांडता येतील अशा वस्तू यांना दिसतील अशा ठिकाणी ठेवाव्यात. फक्त जिथे आपला टेपरेकॉर्डर, डिक्स वगैरे असतात, या खोलीतल्या विजेच्या बटणांना शॉक येतो असे सांगून ती खोली बंद ठेवावी. मी केलेल्या उपदेशातला बाकीचा सर्व उपदेश विसरलास तरी चालेल, पण बायकोचा वाढदिवस विसरू नकोस. वाढदिवस कितवा,याला महत्वाचा नाही. त्रिलोकरशेट या माझ्या परममित्राला आपल्या बायकोच्या वाढदिवसाचा विसर पडला, ती हकीकत यांनी मला सागिंतली, तशी तुला सांगतो. ऐक. "सालं काय सांगू तुला, अरे वाईफचा बर्थ डे. टोटली फरगॉट, जी भडकली. सालं विचारू नको. एकदम नो टॉक. बरं, साली बायको अशी टॉकीच्याबद्दल सायलेंट फिल्म होऊन बसली की, आपण तोंड बंद ठेवतो. - जी भडकली - जी भडकली - मी ब्रेकफासला काय आहे विचारल्यावर टीपॉयवरची दाताची कवळीच तिनी काढून खिडकीतून भायेर फेकून दिली. साली टूथर्टिफाइव रुपीज टिकवून तळपदे डेंटिसकडून आणलेली कवळी भाई जीवनजी लेनवर,साले बत्तीसच्या बत्तीस दात पसरले. आणि साला जोक सांगतो तुला. कवळी फेकली ती माझी समजून तिची स्वतःचीच. माझे दात पाण्यानी भरलेल्या बाऊलमधून तिच्याकडे बघून साले काच फुटेपर्यंत हसत होते. मी सालं पटकन माझी कवळी तोंडात घातली - तिचं विदाऊट टूथ तोंड पाह्यल्यावर एकदम साली आमच्या डोळयातली ट्यूब पेटली - साला वाईफचा फिफ्टिएट्थ बर्थ डे. कारण बरोबर फिफ्टीसेकंड बर्थडेला मी तिला तळपदे डॉक्टरकडून कवळी बसवली होती. बर्थडेच्या दिवशी कवळी फेकून बसली - मला सालं समजेना, हॅपी बर्थ डे म्हणू का नको म्हणू? तसाच साला चप्पल घालून निघालो आणि तिला खुश करावं म्हणून तिच्या आवडीचे लाडू घेऊन आलो. तो साला फणसवाडीतला दयाराम मिठायवाला पण अवंग साला. याला धादा वॉर्न करून सागिंतलं - नरम बुंदी. तर या इडियटनी पिशवीत भरून दिले एक डझन कडक बुंदी. साला वाईफच्या तोंडात नाय दात - ती कडक बुंदी काय खाणार कप्पाळ. साला तिला वाटलं, मी पर्पजली कडक बुंदी आणली. साला तुला ---



सांगतो. तोंडात दात नसताना या वाइफ लोक जेव्हा भडकून बोलतात ना, तो साला साऊंडपण हॉरिबल आणि साईट तर मल्टिफ्लाईड बाय हंड्रेड हॉरिबल. आता मी काय ट्रिक केलीय म्हाईत आहे? साईबाबाच्या फोटोखाली भिंतीवर खिळयांनी वाईफची बर्थ डेट कोरून ठेवली आहे. साल्या दाताच्या कवळया म्हाग किती झाल्यायेत म्हाइत नाय तुला? - करणार काय? मीच इडियट साला. वाईफचा बर्थ डे विसरलो."

असो. नवीन लग्न झालेल्या वराचा फार वेळ घेऊ नये. असा वेळ घेणारा माणूस पुढल्या जन्मी गुरखा नाही तर दूधवाला भय्या होतो म्हणतात. पण माझा हा उपदेश पाळणा-यास उत्तम संसारसुख प्राप्त होऊन, ताजे मासे, धनधान्य, संतती, संपत्ती, साखर, मुलांना शाळेत प्रवेश, वह्या, बसमध्ये आणि लोकलमध्ये खिडकीजवळची जागा, टेलिफोनवर हवा तोच नंबर मिळणे वगैरे सर्व गोष्टींचा भरपूर लाभ होवोन संसारात सदैव आनंदी, आनंद नांदेल. तथास्तु.

तुझा

पी. एल. काका

माणिक वर्मा या प्रसिद्ध गायिका.
एका संगीत कार्यक्रमात सुधीर गाडगीळ त्यांची मुलाखात घेत होते.
प्रेक्षकांच्या पहिल्या रांगेत बसून पु.लं. ही मुलाखात ऐकत होते.
हसत खेळत चाललेल्या त्या मुलाखतीत
गाडगीळांनी माणिक वर्मा यांना, त्यांच्या पतीबद्दल प्रश्न विचारला,

"तुमची अन, त्यांची पहिली भेट नेमकी कुठं झाली होती?"

लग्नाला खुप वर्षे होऊनही माणिक वर्मा या प्रश्नाला उत्तर देताना
टाळाटाळ करीत होत्या.
ते पाहुन पहिल्या रांगेतील पु.लं. उत्स्फुर्तपणे मोठ्यानं म्हणाले,

"अरे सुधीर, सारखं सारखं त्यांच्या 'वर्मा'वर नको रे बोट ठेवुस!"



असाच एक मन्या बघा गोप्याला काय सांगतोय ---



## "ईव्हनिंग क्लास" ...

गोप्या म्हणे मन्याला, सांग बरं ग्रॅहम बेल कोण?
अरे बनवला ज्या शास्त्रज्ञाने सर्वप्रथम टेलीफोन!
उत्तराला मित्रा तू असा कधीच मुकला नसतास,
जर "ईव्हनिंग क्लास" तू जॉईन केला असतास!

गोप्या म्हणे मन्याला, कोण अलेक्झांडर ड्युमस?
अरे लिहीलं ज्याने "The 3 Musketeers" खास!
उत्तराला मित्रा तू असा कधीच मुकला नसतास,
जर "ईव्हनिंग क्लास" तू जॉईन केला असतास!

गोप्या म्हणे मन्याला, तुला माहीत आहे का ऍब्बा?
अरे जुनी हिट रॉक गाणी त्यांनीच गायली रे बाबा!
उत्तराला मित्रा तू असा कधीच मुकला नसतास,
जर "ईव्हनिंग क्लास" तू जॉईन केला असतास!

आता मात्र मन्याचा पारा चांगलाच चढला होता?
रोज गोप्याचा हाच डायलॉग कानी पडला होता!
उत्तराला मित्रा तू असा कधीच मुकला नसतास,
जर "ईव्हनिंग क्लास" तू जॉईन केला असतास!

मन्या म्हणे गोप्याला, कोण आहे बरं बबन मस्ताना?
तुझ्या बायकोसंगे फिरायला जातो तू घरी नसताना!
उत्तराला मित्रा तू ही असा कधीच मुकला नसतास,
जर तो "ईव्हनिंग क्लास" तू जॉईन केला नसतास



- चंद्रजीत ...

' पुलं'चं लिखाण, त्यांचे परफॉर्मन्सेस आजही अनेकांना आनंद देतात, क्षणभर का होईना त्यांच्या निखळ विनोदातून जगण्यातल्या दैनंदिन विवंचनांचा विसर पडतो... 'पुलं'च्या या मोठेपणाची जाणीव मराठीतून एम.ए. करूनही केशकर्तनाचा व्यवसाय करणा-या या लेखकाला आहे. म्हणूनच कामाच्या निमित्ताने त्यांचा 'पुलं' आणि सुनिताबाईंशी जो काही संबंध आला, ती त्यांना त्यांच्या आयुष्यातील फार मोलाची कमाई वाटते. हा त्यांचा अनुभव त्यांच्याच शब्दात ...

सकाळी नऊ-साडेनऊची वेळ; विद्यार्थी सहाय्यक समितीचा एक विद्यार्थी दुकानाचे दार उघडून आत आला. 'तुम्हाला पु. ल. देशपांडे साहेबांचे केस कापण्यास बोलावले आहे.' -त्याच्या या वाक्याने माझ्या चेह-यावर उमटलेले शंकेचे भाव पाहून 'सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांचे केस कापावयाचे आहेत'- त्याने पुन्हा एकदा आपले वाक्य पूर्ण केले अन् समोर बसलेल्या गि-हाईकाचा कान माझ्या कात्रीत येता-येता वाचला. आश्चर्य आणि आनंद यांच्या धक्क्यातून सावरत मी त्याला 'हो लगेच निघतो' असे म्हणालो आणि समोर बसलेल्या गि-हाईकाकडे आरशात पाहू लागलो. त्याच्या तोंडाचा झालेला चंबू मला स्पष्ट दिसत होता. 'पुलं'चा निस्सिम भक्त असलेल्या त्या गि-हाईकाला माझ्या इतकाच आनंद आणि आश्चर्याचा धक्का बसलेला होता. 'राहू द्या हो माझे राहिलेले केस नंतर कापा. मला काही घाई नाही.' त्याच्या या वाक्यातून 'पुलं' बद्दलचे त्याचे प्रेम व्यक्त होत होते. तरीही त्यांना कसेबसे मार्गी लावून मी माझी हत्यारे गोळा करून बॅगेत भरली. त्या मुलाची अन् माझी ओळख सुप्रसिद्ध क्रिकेट महर्षि देवधरांच्या घरी केस कापावयास जात असे तेव्हापासून झालेली होती. त्यामुळे त्याने निमंत्रण शंभर टक्के खरे असणार यावर माझा विश्वास होता.



थोड्याच वेळात मी 'रुपाली' मध्ये दाखल झालो. दारावरची बेल वाजवली. सुनिताबाईंनीच दार उघडले आणि 'या' म्हणून हसत स्वागत केले. समोरच्या सोफ्याकडे बोट दाखवून त्यांनी बसण्यास सांगितले. 'थोडावेळ बसा; भाई जरा नाश्ता करतो आहे' असं म्हणत त्या किचनमध्ये गेल्या. आपण आज प्रत्यक्ष पुलंना भेटणार याचा आनंद जेवढा झाला होता, तेवढेच त्यांचे केस कापावयाचे या कल्पनेने टेन्शनही आले होते. अवघ्या महाराष्ट्राच्या लाडक्या व्यक्तिमत्वाच्या बाह्यदर्शनाची जबाबदारी आज माझ्यावर येऊन पडलेली होती अन् त्यात थोडाफार जरी फरक पडला तर उभा महाराष्ट्र मला माफ करणार नाही, याची मला जाणीव होती. त्यामुळे मी काहीसा अस्वस्थ झालो होतो. इतक्यात किचनमधून

सावकाश पावले टाकीत ते हॉलमध्ये आले. मी पटकन खुर्ची देऊन, त्यांच्या पायाला स्पर्श करून नमस्कार केला. त्यांनी हसून मला आशीर्वाद दिला. इतक्यात सुनिताबाई बाहेर आल्या. 'चंदकांत, यांचे केस बारीक करून टाका' म्हणून मला आज्ञा केली आणि त्या समोरच्याच सोफ्यावर बसून काहीतरी लिहीण्यात गर्क झाल्या. त्यांचे लक्ष नाही असे पाहून 'फार लहान करू नका, थोडेच कापा' पुलं माझ्या कानात कुजबुजले. माझी अवस्था माझ्याच कात्रीत सापडल्यासारखी झाली होती. इतक्या वर्षांच्या व्यावसायिक अनुभवाचा वापर करून मी आपला मध्यम मार्ग निवडला. त्यांच्या ओरिजिनल छबीत माझ्या कात्रीने काही फरक पडणार नाही, याची पुरेपूर काळजी घेत माझी केशकर्तन कला चालू होती. मधूनच एखादा फोन येत होता पलिकडील व्यक्ती एकदा तरी पुलंना भेटण्याची कळकळीची विनंती करीत होती आणि सुनिताबाई त्यांना ठाम नकार देत होत्या. पहिल्याच दिवशी पुलं त्यांना 'पुलं-स्वामिनी' का म्हणतात याचा अर्थ उमगला. त्यामुळे त्यांच्याविषयी इतरांचा गैरसमज होणे स्वाभाविक होते. परंतु त्यांना ज्यांनी जवळून पाहिलेले आहे त्यांना त्यांच्या या वागण्यामागचा अर्थ निश्चितच समजला असता. खरं तर भाईंच्या तब्येतीची त्या अतोनात काळजी घेत होत्या. त्यांच्या खाण्यापिण्याच्या वेळा,औषधाच्या वेळा, विश्रांतींच्या वेळा या गोष्टींकडे त्या जातीने लक्ष देत होत्या. अधूनमधून त्यांना पुस्तके वाचून दाखविणे, लिखाण करणे, चर्चा करणे हेही चालूच होते.



केस कापून झाल्यावर मी सुनिताबाईंकडे अभिप्रायाच्या दृष्टीने पाहिले व 'वा छान!' म्हणून त्यांनी पसंतीची पावती दिली आणि माझ्या केशकर्तनकलेतील सवोर्च्च डिग्री प्राप्त केल्याचा आनंद मला झाला. कापलेले केस झाडून मी ते पेपरमध्ये गुंडाळू लागलो, तेव्हा त्यांनी ते मला घरातील कचऱ्याच्या डब्यात टाकण्यास सांगितले. पुढे हे काम त्यांची मोलकरीणच करीत असे. पण एक दिवशी असाच एक किस्सा घडला त्या दिवशी मोलकरीण कामावर आलेली नव्हती. मी कापलेले केस एका प्लास्टिकच्या पिशवीत भरत असताना सुनिताबाईंनी पाहिले. 'चंदकांत ते केस त्या प्लॅस्टिकच्या डब्यात टाका' त्यांनी आज्ञा केली. मला जरा विनोद करावासा वाटला. मी म्हटलं, 'नको हे केस प्लॅस्टिकच्या पिशवीत भरून मी घरी नेणार आहे. त्यात एक चिट्ठी लिहून ठेवणार आहे की 'हे केस सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या डोक्यावरील आहेत. त्याखाली त्यांची आता सही घेणार आहे आणि माझ्या घराच्या एखाद्या कोप-यात पुरून ठेवणार आहे. पुढेमागे उत्खननात ते सापडले तर त्यावेळी त्यांच्या येणा-या किंमतीने माझ्या काही भावी पिढ्या श्रीमंत होऊन जातील.' त्यावर पुलंसह सुनिताबाईही खळखळून हसल्या आणि म्हणाल्या ' तो काय येशुख्रिस्त वगैरे आहे की काय ?

' मी मनात म्हणालो 'मी काय किंवा इतरांनी काय, तो  ईश्वर  पाहिला असेल किंवा नसेल. परंतु दैनंदिन जीवनातील संघर्षाला सामोरे जाताना पुलं नावाच्या  या  ईशाने लिहिलेल्या पुस्तकाचे एखादे जरी पान चाळले  तरी  व्यथित  झालेल्या  मनाला  आपल्या  शब्दांनी  आणि शैलीने संजीवनी देऊन, जगण्यातील आनंदाची आठवण करून देण्याचे  सार्मथ्य त्यांच्या लेखणीत होते. म्हणूनच  आम्हां मराठी माणसांचा तोच ईश्वर होता. शेवटी परमेश्वराकडे तरी आम्ही काय मागतो, 'एक आनंदाचं देणं'. पुलंनी तर आपल्या असंख्य पुस्तकातून आम्हासाठी ते भरभरून दिलेलं आहे... '

- चंदकांत बाबुराव राऊत



वसंत सबनीस हे तळवलकरांचे मित्र. एकदा ते सबनिसांच्या घरी गेले, तेव्हा तेथे पु.लं. बसलेच होते. वसंतरावांनी ओळख करून दिली,

"हा मझा मित्र शरद तळवलकर"
"हो का? अरे वा!" पु.ल म्हणाले होते, "चांगला मनुष्य दिसतो! नव्हे,हा चांगलाच असणार!"

"हे कशावरून म्हणतोस तू?" वसंतरावांनी पु.लं. ना विचारलं.
"अरे, याच्या नावावरून कळतेय ते!" पु.ल. म्हणाले. याच्या नावात एकही काना, मात्रा, वेलांटी, उकार काही नाही. म्हणजे, हा माणूस सरळ असणारच!"

गप्पांच्या ओघात पुल एकदा म्हणाले,
' मामा या नावाची गंमतच आहे. त्याला शकुनी म्हणावं, तरी पंचाईत आणि अपशकुनी म्हणावं तरी पंचाईत. '

पुलं एका समारंभाला जाण्यासाठी तयार होत असताना म्हणाले,"
मी कुठल्याही समारंभाला 'बो'लावल्याशिवाय जात नाही.

## गुणग्राहक पुलं ...

पुलं केवळ विनोदी लिहीत असा एक गैरसमज आहे. त्यांच्या लिखाणात विनोद असे. पण त्यांचं लिखाण सर्वगुणसंपन्न होतं त्यांच्या लिखाणातलं वैशिष्ट्य म्हणायचं तर त्यांची व्यक्तीचित्रं.त्यांच्या लिखाणातली माणसं जिवंत असत. श्री डी. त्यांचे गुणावगुण सवयी लकबी बारकावे यांचं सूक्ष्म मार्मिक दर्शन त्यांच्या लिखाणात असे. त्यांचे काही भाग खाली देत आहे. त्यावरून त्यांच्या लिखाणाचे मर्म जाणवेल.

### म्यूझिक डा(यरे)क्टर केशवराव भोळे

म्युझिक हॉलमध्ये केशवराव भोळे एक एक "पीस" पिसून काढत होते.त्यावेळी ज्यांचे वाद्यांवर हात घटले ते केसवरावांना जन्मभर दुवा देतील. केशवराव संगीतदिग्दर्शक आहेत की गायनमास्तर अशी शंका यावी अशी शिस्त. अशी मेहनत करून घ्यायचे की झोपेत वाजवले तरी चुकू नये. त्यातून तात्यापंतोजींला आवश्यक असलेली जीभ केशवरावांना आहे. तिला शस्त्रवैद्याच्या हत्याराची धार आहे. चुकलेल्याला ते रागावणार नाहीत. पण चुकारपणा दिसला की पट्टा फ़िरलाच ! त्याबरोबरच आस्थाही तितकीच. म्युझिक हॉलच्या बंद वातावरणात वादक दोन तीन तास रिहर्सल करीत बसले की "चला आता एक अर्धा तास मोकळ्या हवेत हिंडून या --" म्हणणारे केशवरावांसारखे संगीत दिग्दर्शक तुरळकच! मात्र राबायच्या वेळी खुप राबायचे.केवळ स्फ़ुर्तीवर विसंबून तबियती'ने कामकरणा-याचा त्यांचा पिंड नाही. प्रत्येक गोष्टीची चिकित्सा करून , परिश्रम करून कलाकृती घडवणा-यापैकी केशवराव एक आहेत.

### बळवंत मोरेश्वर पुरंदरे

हा माणूस किती सहजपणाने आणि शांतपणाने माणसांच्या अंगावर रोमांच उभे करतो ! कुठेही राणा भीमदेवी थाट नाही, अश्रुपात नाही, मुठी आवळणे नाही. त्या पूर्वदित्यावर पडलेल्या कालवस्त्राला अलगद दूर करून पुरंदरे इतिहासाचे दर्शन घडवतात. त्यांना वक्तृत्वाची देणगी आहे. शब्दकळा तर अतिशय साजरी आहे. सूक्ष्म विनोदबुद्धी आहे. पण ही सारी लक्षणे मिरवीत येत नाहीत. भाषेच्या अंगातून अलगद ओसंडत असतात.त्यांचे मराठी सकस आहे, सतेज आहे, निकोप आहे. कुठलीही ऐतिहासिक घटना पचवून ते लिहीतात किंवा बोलतात. "मला अमूक एक ऐतिहासिक कथा ठाऊक नाही, किंवा निश्चित पुरावा नाही म्हणून मी मत देत नाही" हे सांगायची त्यांना भिती वाटत नाही.रसिकत्वात संयम न सोडता आणि शास्त्रोक्त लिहिण्याबोलण्यात रुक्षपणा न आणू देता चाललेले त्यांचे व्याख्यान ऐकणे हा एक सुंदर अनुभव आहे.



## हिराबाई बडोदेकर

आज हिराबाईपेक्षा चौपट तयारीने आणि कल्पकतेने गाणारे गायक आहेत; पण डोळे दिपवणारे कसलेही अंग नसून हिराबाईंची लोकप्रियता तगून आहे. शीतल वा-याच्या झुळका अंगावर घेत बसल्यासारखे लोक स्वस्थ· होऊन बसतात; सूर लयीच्या त्या शांत आविष्कारात खुशीने विलीन होतात. हिराबाईंच्या मैफ़लीत लोकांची दाद· जाते तीही हळूवारपणाने. हे गाणे डोक्याला झिणझिण्या आणित नाही.
सूर कानांतून मनात झिरपतात. त्या गाण्यात कुठे नसती धिटाई नाही. , धांगड दिंगा नाही. लयकारीचे गुणाकार भागाकार नाहीत. सुरांच्या एखाद्या मोहक लडीतून शृंगार सूचित झाला तरी शांताघरी पाहुणा आल्यासारखा. आणि म्हणूनच ह्या गाण्याला शारदीय चंद्रकळेची शोभा आहे. हे गाणे तलम आहे,पण विसविशीत नाही ; भावपूर्ण आहे,पण ओक्साबोक्षी नाही; हिशेबात आहे पण रुक्ष नाही; हमखास आहे पण पढीक नाही. आणि स्वतंत्र शैली घेऊन आले आहे पण घराण्याचे कुलाचार सोडून नाही.

## बालगंधर्व

काही काही स्वर तर बालगंधर्वांना आंदण मिळाले आहेत. शिवरायांच्या मागून लालमहाली फ़िरण्यातले वैफ़ल्य जसे मनाला हुरहुर लावते तसे बालगंधर्वांच्या भीमपलास ' बागेश्रीतला कोमल गंधार ,निषाद ऐकल्यावर बाकिच्यांचे गंधार निषाद उपरे वाटतात. ह्या स्वरांत त्यांनी स्वरांचा मर्मबंध पकडला.

नरायणराव केवळ गळ्याने गायले नाहीत. उद्या जर त्यांच्या पायाच्या अंगठ्याला स्वर फ़ुटला तर तिथूनही तेच गाणे स्त्रवेल. उसाचे कांडे जसे जसे सर्वत्र गोड, तसे त्या गाण्याचे आहे.

शरदाचे चांदणे जसे चिकित्सेच्या पलिकडले तसेच हे गाणे. त्या पौर्णिमेच्या चांदण्यात देऊळ आणि बाजरपेठेचा रस्ता दोघांनाही मोहकता येते. तशी बालगंधर्वांच्या स्वरांत न्हाऊन आलेली बाराखडीतली रस्त्यातल्या धोंड्यासाखीं कठोर अक्षरेही खडीसाखरेसारखी गोड होऊन येत. "मम सुखाची ठेव देवा" यातला ठेव· शब्द आजचा भावगीतवाला ओटःआंशी आणताना दहा वेळा विचार करील. पण नारायणरावांनी केलेल हे स्वरमय आर्जव असंख्य जीवांचे पाणी करून गेले आहे.



- सुनिल सामंत

चंचुमल : बाबा...मी आज तुम्हाला अभिमान वाटेल असं काम केलंय.
कवडीमल : हो का...काय केलंस तरी काय?
चुंचूमल : मी दादरपासून बसच्या मागे धावत गेलो आणि दहा रुपये वाचवले चक्क.
कवडीमल : अरे मूर्खा...पण बसच्या ऐवजी जर कूलकॅबच्या मागे धावला असतास तर शंभर रुपये नसते का वाचले.

खरच बस मधुन प्रवास करण्यापेक्षा बस मागे धावणच योग्य ...
का? अहो का काय विचारताय ही कविता वाचा म्हणजे कळेल ..

## बसचालक ...

अजूनही त्या ट्राफिक सिग्नलकडे करतात ते दुर्लक्ष
सुस्साट निघून जातात आणि पोलिसमामाच्या समक्ष!
"रस्त्याचा मी मालक" हे वर्तन त्यांचे सुधरले नाही,
आमचे हे बसचालक मात्र तिळमात्रही बदलले नाहीत!!

ऑटो आणि कार त्यांच्यापुढे जणू खेळणीच दिसतात,
ढगामागून त्यांच्या चालकाला पाहून यमराज हसतात!
ड्राईव्हर की यमदूत हे कोडे लोकांना उमगले नाही,
आमचे हे बसचालक मात्र तिळमात्रही बदलले नाहीत!!

चौकातील गतीरोधकांवरही ते बस दणादण उडवतात,
आणि ९० अंशाच्या वळणावरही ऍक्सिलरेटर दाबतात!
ड्राईव्हींगच्या मूलभूत शिक्षेला अव्हान देणे थांबवले नाही,
आमचे हे बसचालक मात्र तिळमात्रही बदलले नाहीत!!

"शुमाकरचे हे वंशज" असे अनेक लोक त्यांना म्हणतात,
पण शुमाकरही त्यांना घाबरेल हेदेखिल लोक जाणतात!
साध्या सडकेवर फोर्म्युला-१ इतर कोणीही जमवले नाही,
आमचे हे बसचालक मात्र तिळमात्रही बदलले नाहीत!!



चंद्रजीत कांचन

## सदा माजगावकर ...

प्रत्येकाला आपल्या आयूष्यात अशी काही माणस भेटतात की त्यां माणसांची त्यांच्याहून अधिक हूरहूर आपल्याला असते. 'या माणसाच कसं होईल' हा विचार आपल्या मनात रेंगाळत राहतो पण त्या माणसाच्या चेह-यावर त्या चिंतेची साधी छटा सुद्धा कधी उमटलेली दिसत नाही. अशी माणस आपल्या नशीबात हेच आहे म्हणून जगत असतात. ते कधी ध्येय्यांची गणित मांडत नाहीत, आणि आलं गेल्याचा हीशोबही ठेवत नाहीत आलेला दिवस ढकलायचा आणि ढकलेला दिवस मजुरीच्या कार्डात भरला म्हणून मोजायचा. एवढच जगण, बाकी इतर कोणत्याही गोष्टींचा उपभोग घेण आपल्या भाग्यात नाही हा मनाशी केलेला पक्का करार.

असाच एक इसम सदा माजगावकर व्यवसायाने ईलेक्ट्रीशीयन. वसईत कूलर मशीन बनवणा-या कंपनीत वायरींग करणारा वायरमन. मीही त्याच फ़ील्ड मधला असलो तरी पहीली काही वर्षे दुसरीच कामं केली, शेवटी कशात राम नाही म्हणून, कोलेजात वीस टक्के हजेरी असुनही मिळवलेल्या पदवीला फ़ुकट का घालवा या विचाराने त्याच कंपनीत रूजू झालो. पहील्याच दिवशी तिथल्या सुपरवाईजरने माझा चेहरा बघुन की कुणास ठाऊक का म्हणून मलाही याच सदा बरोबर कामाला जुंपला कदाचीत दोन सारखेच बैल एकत्र चांगल काम करतात असा त्याचा विश्वास असावा मी प्रथम सदाला पाहील तेव्हां दुस-या दिवशी काम सोडून द्यायच हे मनात पक्क केल होत. सुपरवाईजर ने दिलेल काम मी बरोबर करतोय का ? किंवा चुकल तरी दुर्लक्ष करायच हे या सदाने ठरवून ठेवल असाव असा माझा समझ झाला. शेवटी जेवण आटपल्यावर कळाल की याला सकाळीच त्या सुपर्वाईजर कडून तडी पडली होती. त्यामुळे याचा चेहरा जळालेल्या वेल्डींगसारखा झाला होता. अखेर दिवस संपेपर्यंत माझ नाव आणी गाव एकुन त्याचा चेहरा थोडा का होईना पण खुलला आम्ही दोघही कोकणातले कळाल्यावर आम्हा दोघांनाही तितकाच आंनद झाला शेवटी उद्या न येण्याचा विचार मी मनातून काढून टाकला. त्या एका दिवसात पुर्ण कंपनिचा इतिहास , भुगोल आणी अमच्या डिपार्टमेन्टं मधल्या कामगाराच विद्न्यान त्याने मला समजवून दिल. आणी ते देखील मालवणी भाषेत घरी जाताना वसई स्टेशन बाहेर एसटी मध्ये कस चढायच याचे धडे घेउन मी घरी परतलो. कारण सकाळी याच कारणामुळे मी पहील्या दिवशी चक्क एक तास उशीरा पोहचलो होतो दुस-या दिवशी मला दिलेले निर्देश पाळत मी एसटी पकडली बघतो तर सदा ने माझ्यासाठी सिट आधीच आडवून ठेवलेली,



सदा माझ्या सोबत असला तरी माझ्या आधी बस मध्ये कसा चढायचा हे मला पहिल्या दोन तीन दिवसात पडलेल सर्वात मोठ कोड होत. नंतर कळाल हा अपघात कालीन खिडकीचा वापर करतो तस करणारे महाभाग बरेच होते. हळूहळू मीही त्या चोर वाटेचा फ़ायदा घेउ लागलो. सदा कडून मला खुप धडे मिळाले त्यातला पहिला धडा म्हणजे ट्रेन आणी बस मध्ये जर कोणाला आपला धक्का लागला आणी समोरच्या माणसाने प्रश्न केला तर त्याला उत्तर कस द्यायच. एकदा एका बलाढ्य देहाच्या पायावर माझा पाय पडला तो गरजला मी म्हटल "माफ़ करा" तरी त्यांच मन भरेना " काय रे दिसत नाही का? जरा बघुन चाल" मि काही बोलण्याआधी सदा त्याला म्हणाला ”अहो तुमच्या पायावर पाय ठेवायला त्याला मजा येते, त्याला हौस आहे पायावर पाय ठेवायची” सगळ्या बस मध्ये हशा पिकला तो माणूस लगेच शांत झाला हेच उत्तर देउन त्याने भल्या भल्यांना गप्प केल होत. आणी हे कमी होत म्हणून की काय म्हणे सौच्छायलात कोणी किती वेळ लावता हो असा प्रश्न केला तरी 'खुप मजा येते हो आत' हेच उत्तर द्यायच, खूप मजा येते या एका वाक्याने सदा सगळ्यांना गप्प करायचा. बाकी दुसरा कोणताही प्रकार त्याला जमला नसता. साधारण वय वर्ष ३२ अगदि सडपातळ देह, काळा वर्ण, खोल गेलेले डोळे, ओठांना स्पर्श करणा-या मिशा, आणी त्या मिशांना स्पर्श करणारे नाकातले केस, लांब लचक नाक, डोक्यावर केस होते पण त्या केसांना नेमक वळण कोणत ते कळण अवघड कधी कोणत्या दिशेला असतिल सांगण कठीण, अंगापेक्षा दुप्पट मापाचे शर्ट आणी पँट घासुन घासुन रंग उडालेली त्या कपड्यांएवढ जर सदाला घासल असत तर काळ्याचा गोरा नाही पण सावळा तरी नक्की झाला असता, पँट कमरेतून खाली पडू नये म्हणून करकच आवळलेला बेल्ट पायात आतला निळा रंग दिसेपर्यंत झरलेली स्लिपर गळ्यात लाल धागा त्यात साईबाबांचा फ़ोटो आणी खाद्यांवर सगळ्या झीप तुटलेली बॅग पन्नांस कीलो वजन भरेल तेही त्या अंगापेक्षा दुप्पट कपड्यांमुळे त्याचे कपडे शिवणारा टेलर हा बहूतेक मारवाडी असावा उरलेल कापड फ़ेकुन द्याव लागत म्हणून तो असे कपडे शिवत असेल असा त्यावेळी माझा समझ झालेला. त्यावेळी माझ व य २२ वर्ष असाव आमच्या वयात १० वर्षाचा फ़रक असला तरी असा हा निराळाच मनुष्य माझ्या आयुष्यात आला आणी कधी माझा मित्र झाला ते कळालच नाही.



सदा बरोबर अजुनही ब-याच मित्रांचा योग आला काही यूपी वाले काही बंगाली एक दापोलिचा मामा त्या व्यक्तिला पुर्ण कंपनीत मामा याच नावाने हाक मारायचे पण त्या नावात मामा ने नातं नव्हत तर मामा ही त्याची उडवलेली खिल्ली असुनही त्या मामाने त्याचा कधीच विरोध केला नाही आपल अख्ख बिराड गावी ठेउन हा माणूस वयाच्या ४५ वर्षापर्यंत नातेवाईकाकडेच राहत आला होता. त्यात त्याचा काही दोश नव्हता त्या कंपनीत वर्षाला होणार ईक्रींमेन्ट म्हणजे दिवसाला ७ रू एवढीच झालीच तर एखाद्या ईजिनियरची १० रू. १० रूपया वर

झालेली एकही पगार वाढ तिथे २० वर्ष काम करणा-या अकांऊटंट ला आठवत नाही अस त्याच उत्तर. हा बोनस मात्र मिळायचा माझ्या आयूष्यात धरलेल्या आणि सोडलेल्या कामांमध्ये बोनस हा योग आलाच नाही कारण मी जेव्हां काम धरायचो त्या तारखेपासुन दिवाळीला वर्ष पुर्ण झाल नाही म्हणून बोनस नाही आणि दुसरी दिवाळी येईपर्यंत मी तीथे नसे. सदाचा बोनस झाला आणि संपला सुद्धा. यावेळी सदाने नविन बॅग घेतली त्याची ती जुनी बॅग बघुन मला बॅग ह्या प्रकाराचा वीट आला होता. पण नविन बॅग बघुन मलाही आनंद झाला. मी म्हणालो अजुन काय घेतल रे " काय नाय रे झिलग्याक ती चामड्याची पॅट घेतलय" चामड्याची पॅंट हा प्रकार मला निट कळाला नाही पाहून लगेच म्हणाला "जीन्स रे जीन्स" पण आउशीक रे खाव व्हरान त्या दुकानदारान मामा केल्यान माका" मी सांगलय झीलग्याची दि त्या मायझयान बाईल माणसांची दिल्यान" हा लेडीज जिन्स घेवुन आला होता आणी त्याच्या मुलाने ती लेडीज जिन्स घालून दोन दिवसभर मिरवल्या नंतर हा प्रकार त्याच्या लक्षात आला होता. आणी लेडीज किंवा जेन्टंस जीन्स मलाही अजुन ओळखायला येत नाही कदाचित माझ्या जिन्स न घालण्याच हेही एक कारण असाव. माझ्या ओळखीच्या एका मुलीने तर या प्रकारात कमालच केलेली तिला थ्री फ़ोर्थ जिन्स घ्यायची होती आणि दुकारदारा कडे ह्या मुलीने अगदि ओरडून वन फ़ोर्थ जीन्स दाखवा अशी मागणी केली होती असतात असे महाभाग सदाने मात्र आपल्या मुलाला तीच जिन्स वापरायची बजावून हा विषय तिथेच संपवला होता.



एरवी सदा शांत असायचा त्याच जगाशी फ़ारस नात नाही असच वागायचा घर काम आणि तंबाखू एवढच त्याच जगण. हजेरी कार्डावर दिवस आणि व्हरटाईम चे तास दर दिवशी मोजायचा.संध्याकाळचा माझा क्लास असल्यामुळे मी ओव्हरटाईम साठी थांबायचो नाही.सदा नेहमी आळश्यासारखा काम करायचा हात चालायचाच नाही त्याचा, अवघ्या सहा महीन्यातच ब-याच कामाची जवाबदारी माझ्यारच येउ लागली. मला बढती मिळाली हे बघुन सदानेही माझ्या मनासारख जोमाने काम केल त्या महिन्यातला पगार जेव्हां आला सदाच्या चेह-यावर मला प्रश्न चिन्हं दिसल मी विचारल "काय रे काय झाल" सदा शांतपणे म्हणाला "मी काम सोडतय" मी दचकलो म्हणालो अस करू नकोस तु सोडलस तर मी पण सोडेन तो म्हणला " तू सोडत असशीत तर मी नाही सोडत" मी विचारात पडलो दुस-या क्षणाला म्हणाला “मेल्या तु धावलय आणी गेल्या महीन्यात शेवटी ओव्हर टाईम बंद झालो, आता यात घराच्या कर्जाचो हप्तो भरू की घरात सामान भरू" ७ दिवसाच्या ओव्हरटाईमने महीन्या भराची गणित चुकतात हे कळून आल मला त्या दिवसापासून माझी पुन्हां कोणतीच बढती झाली नाही सगळयांच कामगारांचे सावकाश चालणारे हात माझ्या धावणा-या हातांना थोपवू लागले आणी मलाही ते मान्य झाल.

सदा आयूष्य जगायचा ते विरार ला ४० हजारात घेतलेल्या ८ बाय ८ च्या घराचे कर्ज फ़ेडण्यासाठी. जगायाचा की मरमर मरायचा ह्या प्रश्नांच उत्तर माझ्याकडे नाही. त्याच्या ते शरीरापेक्षा दुप्पट असणारे कपडे शिवणारा टेलर घाटकोपरचा होता कारण ते कपडे सदाचे नव्हतेच कधी. घाटकोपरला राहणा-या मोठ्या भवाचे खराब कपडे तो वापरायचा. आपला डबा हळू खाण्यामागे त्यात आणलेल्या तिन चपात्या कोणाला कळू नये हा एकच उद्देश असायचा दिवाळीत आपल दारीद्र्य कोणी पाहू म्हणून त्यान्न घरी न नेता सगळयांना जीवदानीच दर्शन घडवल होत. आज ६ वर्ष उलटून गेली सदाला भेटलो नाही तो कुठे आहे कसा आहे मला ठाऊक नाही आजही मी एसटी पाहीली की मागच्या खिडकीतून चढणा-या सदा शोधतो कदाचित आजही तो ७ रू होणा-या ईक्रींमेट वर तिथेच काम करत असेलही मी नेहमी त्या मित्रासाठी सकाळी ७ वाजता उठून वसईला जाण्याचा विचार करत राहतो पण सुर्योदय आणि माझा मित्र दोघेही हल्ली माझ्या नशीबात नाहीत. कदाचित अशा मित्रांसाठी आपल्याला वेळ मिळतोच अस नाही कारण प्रत्येकाला हजेरी कार्डाहून मोठा मित्र नसतो हे नक्की ...

सुधीर मुळीक.





पुलंचे लेख, माहीती, व किस्से यासाठी भेट द्या ...
http://cooldeepak.blogspot.com

सदर अंकासाठी काही लेख उपलब्ध करून दिल्याबद्दल वरिल ब्लोगचे नियोजक श्री. दिपक यांचे मनःपुर्वक आभार ...

## पु. लं. - अखेरचा अध्याय ...

'हॉस्पिटल' हा शब्द ऐकला की माझ्या काळजाचा ( की हृदयाचा?) ठोका चुकतो. त्यामुळे डॉक्टरांनाही मी आजारी असल्याचं घोषित करणं सोपं जातं.. साध्या डासाच्या रक्तानंदेखील मला गरगरतं. पूर्वी एस. टी. च्या मोटारीखाली आलेली म्हैस बघण्यासाठी पुढे सरसावलेला मी रक्ताचा ओघळ पाहून मागे परतलो होतो... हॉस्पिटलमधे जायचे प्रसंगही तसे माझ्यावर कमीच आले. नाही म्हणायला आमच्याकडे 'दुष्यंत' नावाचा कुत्रा जेव्हा होता, तेव्हा त्यानं केलेल्या स्वागतात सापडलेल्या पाहुण्यांना भेटायला ( संबंध बिघडू नयेत म्हणून ) मी हॉस्पिटलमधे गेलो होतो ! यावेळी मात्र मामला वेगळा होता. माझी प्रकृती थोडी नरम वाटल्यामुळे ( किंवा कुठलीही गोष्ट मी नरमपणे घेत नसल्यामुळे ) मंडळींनी मला हॉस्पिटलमधे नेण्याचा 'घाट' घातला. ( अलीकडे 'वळण' जरी 'सरळ'पणाकडे 'झुकत' असलं, तरी 'घाटा' चा 'कल' मात्र अजूनही अवघडपणाकडेच आहे हे यावेळी माझ्या लक्षात आलं.) हॉस्पिटलमधे जायचा पूर्वानुभव फारसा नसल्यामुळे मी काय काय गोष्टी बरोबर नेता येतील, याचा विचार करू लागलो... पण मी नेसत्या वस्त्रांनिशीच जायचं आहे आणि कपड्यांची पिशवी मागाहून येईल असा खुलासा करण्यात आला बाहेर पडताना मात्र मला उगाचच एच. मंगेशरावांनी बटाट्याच्या चाळीचं शिष्टमंडळ पाठवताना लावलेली 'ओ दूर जानेवाले' ची रेकॉर्ड आठवली.

हॉस्पिटलच्या खोलीत दाखल झाल्यावर मात्र, मी स्वतःवर आजारपण बिंबवण्याचा वगैरे प्रयत्न करायला लागलो. ( उगाच डॉक्टरांचा हिरमोड होऊ नये म्हणून! ) डॉक्टर तपासत असताना मी चेहरा शक्य तितका गंभीर ठेवला होता. अर्थात मला तपासणा-या डॉक्टरचा हिरमोड झाला नसावा, हे तो त्याच्या सहका-यांशी ज्या अगम्य भाषेतून बोलला, त्यावरून मी ताडलं. ( बारा भाषांमधे मौन पाळता येणा-या आचार्य बाबा बर्व्यांच्या सान्निध्यात काही काळ गेल्यामुळे काही अगम्य भाषांमधल्या संभाषणाचा रोख कुठे असावा, हे मी ओळखू शकत होतो. हे डॉक्टर्स जी भाषा बोलतात तिला 'मेडिकल लँग्वेज' म्हणतात आणि ती इंग्रजीच्या बरीच 'जवळून' जाते हे मी तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतो!) त्यानंतर काही वरिष्ठ डॉक्टरांनीही येऊन मला तपासलं. आता माझी खात्री झाली की आजार खरोखर गंभीर असावा आणि मी चेह-यावर गांभीर्य नाही आणलं तरी चालेल.अशा रीतीनं माझं हॉस्पिटलमधलं बस्तान बसू लागलं, बसत होतं एवढ्यात नकळतपणे ' मला हॉस्पिटलमधे दाखल केल्याची 'बातमी फुटली'!



(फुटते ती बातमी आणि फुटतो तो परीक्षेचा पेपर अशी आधुनिक व्याख्या मी मनाशी जुळवू लागलो.) पण काय सांगू? बातमी फुटल्याबरोबर मला भेटायला अनेक मंडळी येऊ लागली. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' हे जेवढं खरं आहे तेवढंच 'व्यक्ती तितके सल्ले' हे माझ्या लक्षात आलं. किंबहुना 'एका व्यक्तीमागे दहा सल्ले, तर अमुक व्यक्तींमागे किती' अशी गणितंही मी मनात सोडवू लागलो. (मला दामले मास्तर आठवले.) लोकांचे सल्ले मात्र चालूच होते... 'स्वस्थ पडून राहा', 'विश्रांती घ्या' इथपासून 'पर्वती चढून-उतरून या' इथपर्यंत सूचना मिळाल्या. ( एकानं 'सिंहगड' सुद्धा सुचवला! ) 'प्राणायाम','योगासनं' पासून 'रेकी' पर्यंत अतिरेकी सल्लेही मिळाले! काही उत्साही परोपकारी मंडळींनी जेव्हा 'मसाज', 'मालिश' असे शब्द उच्चारले, तेव्हा मात्र डॉक्टरांनी मला त-हेत-हेच्या नळ्यांनी आणि सुयांनी जखडून टाकलं आणि लोक चार हात दूर राहूनच मला पाहू लागले.

हळूहळू माझ्या भोवतीचा हा सुया-नळ्यांचा वेढा वाढू लागला. (अगदी दिलेरखान आणि मिर्झा राजे जयसिंग यांनी घातलेल्या पुरंदरच्या वेढ्यासारखा!... मला हा विचार मनात येताच हरि तात्या आठवले.) यानंतर माझी रवानगी आय. सी. यु. मधे ( बालेकिल्ल्यावर? ) करण्यात आली... अशा विचारांतच मला झोप लागली. मी डोळे उघडले तेव्हा आय. सी. यु.च्या काचेतून मला बघणारी माणसं मला दिसली. मी हसायचा प्रयत्न केला; पण जमत नव्हतं. अरे! पण हे काय? या सगळ्या माणसांचे चेहरे असे का? यांच्या डोळ्यांत पाणी का? मी हे असे शून्यात नजर लावलेले, भकास, उदास चेहरे कधीच पाहिले नव्हते आत्तापर्यंत! (अगदी 'बटाट्याच्या चाळी'च्या कार्यक्रमाच्या वेळेची लोकांची कुरकुरही बटाट्याच्या चाळीबद्दल नसून बटाट्याच्या वेफर्सची आहे हे जाणून घेतलं होतं मी! ) आणि हे असे सगळे चेहरे माझ्यामुळे? ज्यांनी हसावं म्हणून मी कायम प्रयत्न करत आलो, त्यांचे चेहरे माझ्यामुळेच असे व्हावेत? नव्हतं सहन होत मला हे. ( आणि त्यांनाही. ) मी डोळ्यांनी सुचवून पाहिलं मला काय म्हणायचं होतं ते. त्यांना कळलंच नाही कळूनही उपयोग नव्हता ?... ते सगळे लोक समोर तसेच होते. अखेर मीच पुन्हा डोळे मिटले... अगदी कायमचेच आता ते सगळे लोक परत जातील आणि बहुधा माझी पुस्तकं त्यांना पुन्हा हसवतील ... अगदी कायमचीच ....

- श्री. कुमार जावडेकर



पु. लं. च्या अखेरच्या प्रवासाबद्दलचा पु. लं. च्या शैलीची पदोपदी आठवण करून देणारा हा लेख

# ई साहित्य प्रतिष्ठान ...

रसिकांना नेहमी उत्तमोत्तम साहीत्य पुरवण्याच्या ध्यास ई साहित्य प्रतिष्ठान जोमाने पार पाडत आहे या माध्यमातुन आपल्यापर्यंत येणा-या ईस्टाप ह्या विनोदी अंकाच्या आगामी विषयावर आधारित आपले विनोदी साहित्य ( कविता, लेख, विनोद ) आम्हाला पाठवण्यासाठी तसेच हा अंक विनामुल्य मिळवण्यासाठी व आपल्या सुचना, अभिप्राय आणि प्रतिक्रियासांठी मेल करा ...

**eestopp001@gmail.com**

## ई साहीत्य प्रतिष्ठानची विनामुल्य ई साप्ताहिके ...

नेटाक्षरी , ईस्टाप , स्वर नेटाक्षरी , बाल नेटाक्षरी

## प्रसिध्द झालेली ई बुक्स ...

टल्लीची शाळा ...
ग्रेत्हयार्ड लिटरेचर ...
तो आणी ती ...
देशी दारूचे दुकान ...
ई शाळा...
लोकल गोष्टी ...
ओथंब ...

मकरंदच्या त्रीवेण्या ...
चार क्षण ...
प्रियेचे अभंग...
तो मी आणि सिगरेट ...
मोरया ...
मीरा ...
सावळया मुलीची गाणी ...



## आमची ई बुक्स विनामुल्य मिळवण्यासाठी

**esahitya@gmail.com**